**ठळक बातम्या**

- संविधान सभेत झालेल्या चर्चा, हा गौरवशाली वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं प्रधानमंत्र्यांचं ‘मन की बात’ मधून आवाहन

- दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी १ हजार ४० उमेदवारी अर्ज वैध

- हमासबरोबरची युद्धबंदी लांबणीवर टाकल्याची इसराएलची घोषणा

- खो खो विश्वचषक स्पर्धेत भारताचे पुरुष आणि महिला संघ अंतिम फेरीत दाखल

**आणि**

- बॉलीवुड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला प्रकरणी मुख्य संशयिताला ठाण्यातून अटक

**<><><><><>**

संविधान सभेत झालेल्या चर्चा, सदस्यांनी मांडलेले विचार, हा आपला सर्वात मोठा वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा, असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ‘मन की बात’  कार्यक्रमातून  केलं.

भारताच्या प्रजासत्ताकाचा ७५ वा वर्धापन दिन, तसंच भारतीय संविधान लागू झाल्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमीत्त डॉ. बाबासाहेब

आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी संविधान सभेत मांडलेल्या विचारांचं ध्वनिमुद्रण प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांना ऐकवलं. येत्या २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिन असल्याचं स्मरणही त्यांनी श्रोत्यांना करून दिलं. संविधानात निवडणूक आयोगाला आणि लोकशाहीमध्ये लोकांच्या सहभागाला खूप महत्त्वाचं स्थान दिलं आहे, आणि गेल्या दशकभरात देशाची लोकशाही अधिक मजबूत आणि समृद्ध झाली आहे, असं ते म्हणाले. निवडणूक आयोगानं तंत्रज्ञानाचा वापर करत, लोकशाहीला बळ दिलं आहे, असं म्हणत नागरिकांनी वेळोवेळी आपला मताधिकार बजावत लोकशाही प्रक्रियेचा भाग व्हावं आणि त्याला बळ द्यावं, असं आवाहन त्यांनी केलं.

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरू असलेला महाकुंभमेळा म्हणजे एकतेचं दर्शन घडवणारा महाकुंभ आहे, असं ते म्हणाले. यंदाच्या कुंभमेळ्यात युवा वर्गाचा मोठा सहभाग असल्याचा उल्लेख करुन त्यांनी समाधान व्यक्त केलं. देशाच्या विविध भागातले उत्सव- परंपरा आणि कुंभमेळा यांचा संबंध त्यांनी स्पष्ट केला. हा कुंभमेळा डिजीटल माध्यमांतून जागतिक स्तरावर लोकप्रिय ठरत असून त्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे, असं ते म्हणाले....

**होल्ड - बाईट - मन की बात**

भारतानं अंतराळ क्षेत्रात केलेल्या ऐतिहासिक कामगिरीविषयी त्यांनी श्रोत्यांना महिती दिली. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं अंतराळात दोन उपग्रहांना परस्परांसोबत जोडण्याचा प्रयोग नुकतंच यशस्वी करून दाखवल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. भारतीय अंतराळ तंत्रज्ञान स्टार्ट-

अप कंपनीनं देशातला पहिला खाजगी उपग्रह यशस्वीरित्या प्रक्षेपित केल्याची माहिती त्यांनी दिली. या यशामुळे भारतानं आधुनिक अंतराळ तंत्रज्ञानात आघाडी घेतली असून, भारताच्या या कामगिरीतून आपले शास्त्रज्ञ आणि नवोन्मेषक किती दूरदर्शी आहेत याचीच साक्ष मिळते, असं ते म्हणाले.

काही दिवसांपूर्वीच स्टार्टअप इंडिया योजनेला ९ वर्ष पूर्ण झाल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी करून दिलं. या काळात देशात निर्माण झालेले अर्ध्यापेक्षा जास्त स्टार्टअप्स टियर २ आणि टियर ३ शहरांमधले आहेत, यातून आपली स्टार्टअप संस्कृती केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित राहिलेली नाही हेच दिसून येतं, असं ते म्हणाले. याबाबतीतलं उदाहरण मांडतांना त्यांनी महाराष्ट्रातल्या वाशीम शहराचाही उल्लेख केला. छोट्या शहरांमधले अर्ध्यापेक्षा जास्त स्टार्टअप्स मुली चालवतात असंही त्यांनी कौतुकाने सांगितलं.

येत्या २३ जानेवारीला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिनी आपण पराक्रम दिवस साजरा करणार असल्याची आठवण त्यांनी श्रोत्यांना करुन दिली. सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याला उजाळा देतानाच बोस यांच्या घराला भेट दिल्याचा अनुभव त्यांनी श्रोत्यांना ऐकवला. देशात वन्यजीवांच्या संवर्धन आणि सहकार्यासाठी होत असलेल्या, तसंच महिला बचत गटांच्या प्रेरणादायी यशोगाथाही प्रधानंत्र्यांनी आजच्या ‘मन की बात’ मधून श्रोत्यांना ऐकवल्या.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, स्वित्झर्लंडमधल्या दाओस इथं उद्यापासून सुरु होणाऱ्या, जागतिक आर्थिक मंच २०२५ मध्ये सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात ते देशाच्या विकास आराखड्याची माहिती देतील. प्रगतीपथावर मागे पडलेल्या वर्गांसह समाजातल्या सर्व स्तरांच्या विकासासाठी देशानं अनेक पावलं उचलली आहेत, असं वैष्णव यांनी प्रवासाला निघण्यापूर्वी सांगितलं. पाच दिवसांच्या जागतिक आर्थिक मंच कार्यक्रमात, समावेशक विकास तसंच सामाजिक, भौतिक आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण या मुद्द्यांवर व्यापक चर्चा केली जाईल, असंही ते म्हणाले. भारताचं आर्थिक धोरण, डिजिटल संरचना तसंच समाजाच्या सर्व घटकांना सक्षम बनवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर याबाबत जाणून घेण्यासाठी जग उत्सुक असल्याचं  त्यांनी सांगितलं.

या परिषदेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल रात्री रवाना झाले आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत त्यांच्यासोबत आहेत. डाटा केंद्रं, स्वयंचलित वाहनं, सेमीकंडक्टर, विद्युत वाहनं, इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधं आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात मोठ्या संख्येनं सामंजस्य करार या दौर्यात  केले जाणार आहेत.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची छाननी काल झाली, त्यात १ हजार ४० अर्ज वैध ठरले आहेत, अशी माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. दिल्ली विधानसभेच्या एकूण ७० जागांसाठी एकूण १ हजार पाचशे २१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. उद्याच्या दिवसात अर्ज मागे घेता येणार आहेत.

नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात भाजपाचे परवेश वर्मा आणि काँग्रेसचे संदीप दीक्षित यांनी अर्ज दाखल केला आहे. तर दिल्लीच्या विद्यमान मुख्यमंत्री आतिशी यांच्या विरोधात भाजपचे रमेश बिधूडी आणि काँग्रेसच्या अलका लांबा यांनी अर्ज दाखल केला आहे.

**<><><><><>**

इस्त्रायलनं हमासबरोबरची गाझामधली युद्धबंदी लांबणीवर टाकली आहे. मुक्तता करायचं ठरवलेल्या पहिल्या ओलीसांची यादी जोवर हमासकडून प्राप्त होत नाही तोवर युद्धविराम अंमलात येणार नाही, असं इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांनी सांगितलं.  भारतीय वेळेनुसार आज दुपारी बारा वाजता लागू होणार असलेला युद्धविराम सुरू न करण्याचे निर्देश नेत्यान्याहू यांनी संरक्षण दलांना दिले असल्याचं इस्त्रायलच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. हमासनं मात्र हा विलंब तांत्रिक कारणांमुळे झाल्याचं म्हटलं आहे. युद्धविराम करारानुसार, नियोजित प्रत्यर्पणाच्या २४ तास आधी नावं देणं आवश्यक आहे. गाझामधली लढाई थांबवण्याचा करार

हा फक्त तात्पुरता युद्धविराम असून, कराराच्या अटी मोडल्यास युद्ध पुन्हा सुरू करण्याचा हक्क इस्त्रायल राखून ठेवत असल्याचा इशारा, नेत्यान्याहू यांनी काल रात्री दिला होता.

**<><><><><>**

विविध मागण्यांसाठी सध्या निदर्शनं करणाऱ्या शेतकऱ्यांबरोबर चर्चा करण्यासाठी येत्या १४ फेब्रुवारीला चंदीगड इथं बैठक घेण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारनं मांडला आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव प्रियरंजन यांच्या नेतृत्वाखाली, केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधीमंडळानं काल उपोषणाला बसलेले शेतकरी नेते जगजीत सिंह दल्लेवाल आणि इतरांची भेट घेऊन या बैठकीसाठी आमंत्रित केलं. शेतकरी नेते दल्लेवाल हे शेतमालाच्या किमान आधारभूत किंमतीबाबत कायदेशीर हमी आणि इतर मागण्यासह गेल्या ५४ दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात पोलिसांनी जिल्हा राखीव पोलिसांच्या सहकार्यानं ३ माओवाद्यांना अटक केली. यापैकी एका नक्षली अतिरेक्यावर २ लाख तर दुसऱ्या एकावर १ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलेलं होतं. पोलिसांनी या भागातल्या जंगलात घेराबंदी करून या तिघांना ताब्यात घेतलं.

**<><><><><>**

खो खो विश्वचषक स्पर्धेत, भारतीय पुरुष संघानं काल नवी दिल्लीत दक्षिण आफ्रिकेला ६२विरुद्ध ४२ गुणांनी हरवून अंतिम फेरी गाठली. आता विजेतेपदासाठी त्यांचा सामना नेपाळसोबत होईल. तत्पूर्वी, भारतीय महिला संघानं विजयी घोडदौड सुरू ठेवत दक्षिण आफ्रिकेला ६६ विरुद्ध १६ अशा फरकानं पराभूत केलं. आता भारतीय महिला संघ देखील अंतिम फेरीत नेपाळसोबत लढणार आहे.

<><><><><>

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत मिश्र दुहेरीत भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याची चिनी जोडीदार शुआई झँग यांना पुढच्या फेरीत चाल मिळाली आहे. चौथ्या मानांकित ह्युगो निस आणि टेलर टाउनसेंड या जोडीविरुद्धचा त्यांचा सामना रद्द झाला.

पुरुष एकेरीच्या नुकत्याच पार पडलेल्या सामन्यात जॅक ड्रेपर याला कार्लोस अल्काराजविरुद्धच्या सामन्यात दुखापतीमुळे माघार घ्यावी लागली.

महिला एकेरीच्या चौथ्या फेरीत अग्रमानांकित, बेलारूसच्या अरीना सालाबेंका हिनं १७ वर्षांच्या मिरा अँड्रीव्हा हिच्यावर ६-१, ६-२ अशी सहज मात केली. तर अमेरिकेच्या कोको गॉफ हिनं बेलिंडा बेंचिक हिच्यावर ५-७, ६-२, ६-१ असा विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

बॉलीवुड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला प्रकरणी मुख्य संशयिताला मुंबई पोलिसांनी ठाण्यातून अटक केली आहे. त्याचं नाव मोहम्मद शरीफ इस्लाम शहजाद असं असून तो मूळचा बांग्लादेशी

असल्याचा संशय आहे. त्याने आधी आपलं नाव विजय दास असं सांगितलं होतं, पण पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर त्याचं खरं नाव समोर आलं. प्राथमिक पुरावे आणि त्याच्याकडे आढळलेल्या काही गोष्टींवरून तो बांग्लादेशचा नागरिक असल्याची शक्यता दिसत असल्याची माहिती मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. या संशयित चोरीच्या उद्देशानं सैफ अली खानच्या घरात घुसल्याचंही त्यांनी सांगितलं. आज त्याला न्यायालयापुढे हजर केलं जाणार आहे.

//<><><><><>//